# अष्टपैलू व्यक्तिमत्व : राजर्षी शाहू

**प्रा. डॉ. प्रकाश यशवंत बुरूटे** सहाय्यक प्राध्यापक मोहनराव पतंगराव पाटील महाविद्यालय, बोरगांव ता. वाळवा जि. सांगली. मोबा: ९७६६२६६६१८ ईमेल: buruteprakash2010@gmail.com

**प्रा. डॉ. सुनंदा राम परीट** सहाय्यक प्राध्यापक यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, इस्लामपूर ता. वाळवा जि. सांगली. मोबा: ९९६००५८०१२ ईमेल: sunandaparit1986@gmail.com

---

**प्रस्तावना:**

महाराष्ट्रातील थोर समाजसुधारकांमध्ये राजर्षी शाहू यांचे नाव प्राधान्याने घेतले जाते. शिक्षण हेच समाज सुधारण्याचे प्रभावी माध्यम असल्याचे शाहू महाराजांनी जाणले होते आणि यामुळेच सार्वत्रिक मोफत आणि अनिवार्य प्राथमिक शिक्षणप्रसारावर त्यांनी भर दिला. आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार, दलितांचा कैवारी, कलाप्रेमी राजा अशा अनेक नावांनी शाहू महाराज संपूर्ण देशभर ओळखले जात आहेत. समाजात केवळ शिक्षण सुविधा उपलब्ध केल्या म्हणजे समाज शहाणा झाला असे नाही तर स्वत:च्या हक्क, अधिकार, कर्तव्ये इ. ची जाण निर्माण करणोर शिक्षण देण्यास ते आग्रही होते. बहूजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय या समाजाची दारिद्रय, अज्ञान व अंधश्रध्दा इ. मधून सुटका होणार नाही हे शाहू महाराजांनी उत्तमरित्या जाणले होते. यासाठीच शाहू महाराजांनी शिक्षण प्रसारावर अधिक भर दिला. प्रत्येक खेडयापाडयात शिक्षण व्यवस्था सुरू करणा—या शाहू महाराजांची दूरदृष्टी खूपच व्यापक होती. शाहू महाराजांच्या शिक्षणविषयक धाडसी निर्णयामुळेच दलित, अस्पृश्य समाजातील अनेक मुले शिक्षण घेवून मोठ—मोठया पदावर जाऊ शकली. अस्पृश्यता निर्मूलन, घटस्फोट व विधवा पुनर्विवाहास कायदेशीर मान्यता, कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांना संरक्षण, आंतरजातीय विवाहास कायदेशीर मान्यता १९१८, मागासवर्गीय मुला—मुलींना मोफत शिक्षणाची सुविधा इ. अनेक समाजसुधारक कार्ये शाहू महाराजांनी निस्वार्थ भूमिकेतून पार पाडली. शिक्षणाबरोबरच विविध कलांना महाराजांनी राजाश्रय दिला. शेती व उद्योगधंदयास प्रोत्साहन दिले यासाठी विविध कृषी व औद्योगिक प्रदर्शने भरविले. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानमध्ये आपल्या जनतेच्या हिताचे अनेक धाडसी निर्णय घेतले. सदर संशोधन पेपरमध्ये शाहू महाराजांनी विविध क्षेत्रात केलेल्या कार्याचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

**अभ्यासाची उद्दिष्टये:**

सदर अभ्यासाची पुढील उद्दिष्टये निश्चित करण्यात आली आहेत.

१. शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.
२. शाहू महाराजांचे अस्पृश्यता निवारण कार्य जाणून घेणे.
३. कोल्हापूर संस्थानच्या विकासातील शाहू महाराजांचे योगदान अभ्यासणे.

**शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य:**

महाराष्ट्रात सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक परिवर्तन घडवून आणणारे अनेक महापुरूष होवून गेले. शिक्षण क्षेत्रातील प्रगतीबाबत महात्मा फुले, विठ्ठल रामजी शिंदे अशा थोर पुरूषांचा उल्लेख करता येईल. पण या थोर पुरूषांनी समाज—जागृतीचे पेरलेली ज्योत जेंव्हा मंदावत चाचली तेंव्हा शाहू महाराज पुढे सरसावले. शाहू महाराज गादीवर आले तेंव्हा राज्यात २२१ शाळा होत्या व १४,७७१ इतकी विद्यार्थी संख्या होती. महाराजांच्या कारकिर्दीच्या शेवटी एकूण शाळांची संख्या ५०४ इतकी होती. महाराजांचे शिक्षण कार्य हे पुढील विविध पायावर आाधारलेले होते. यामध्ये प्रामुख्याने पुढील महत्वाच्या बाबींचा समावेश होता.

१. बहूजन समाजामध्ये ज्ञानप्राप्तीची जाणिव निर्माण करणे.
२. सामाजिक उच्च—नीचतेची भावना बोथट करणे.
३. समाजोध्दारासाठी शाळा आणि वसतिगृहे काढणे.

महाराजांनी शिक्षणाची ज्ञानगंगा मागासलेल्यांच्या सुप्त गुणांचा विकास घडून आणण्यासाठी सर्वत्र पसरवली. त्यामध्ये

मुक्त शिक्षण प्रसार, प्राथमिक शिक्षण, दुय्यम आणि उच्च शिक्षण इ. चा प्रसार करण्यावर अधिक भर दिला. मागासलेल्या जातींमधील जनतेमध्ये शिक्षणाबद्दल प्रचंड उदासिनता होती. शिक्षण घेउनही सरकारी नोकरी मिळण्याची शक्यता नसल्याने शाहू महाराजांनी २६ जुलै १९०२ रोजी कोल्हापूर संस्थानातील ५०टक्के शासकीय नोकरीमध्ये मागासवर्गीयांना विशेष स्थान दिले. यामुळे मागासवर्गीयांमधील शिक्षणाबद्दलची अनास्था कमी होण्यास मदत झाली.

**स्त्रीशिक्षण विषयक कार्य:**

शाहू महाराज उदारमदवादी शिक्षणापासून ते तांत्रिक शिक्षणापर्यंत अस्पृश्यांच्या शिक्षणापासून ते स्त्री शिक्षणापर्यंत दूरगामी नजरेने पाहणारे शिक्षण तज्ञ होते. राणी इंदूमतींना शिक्षण देण्याच्या संदर्भात राजर्षीचे स्त्रीशिक्षणविषयक विचार पुढे आले. स्त्री सुशिक्षित असेल तर सा—या घराला स्वावलंबन आणि सुसंस्काराचे वळण

लावते. स्त्रीला कोणत्याही संकटकाळात शिक्षण उपयोगी ठरते अशी महाराजांची धारणा होती. पुरूषांनी हातात तलवार घेवून लढावे आणि स्त्रीने चूल आणि मूल सांभाळावे या कवी टेनिसनने सांगितलेल्या स्त्री कार्यक्षेत्राला राजर्षींना धक्का द्यायचा होता. ज्या काळात शाहू महाराजांनी स्त्रीशिक्षणाचे पवित्र कार्यास प्रोत्साहन दिले त्याकाळी स्त्रियांनी शिक्षण घेणे हे एक पाप समजण्यात येई. ज्याकाळी बालविवाह, पर्दापध्दती अस्तित्वात असल्यामुळे स्त्रीशिक्षणात अनेक समस्या निर्माण झाल्या होत्या. स्त्रीयांच्या व्यक्तिमत्वाला ज्ञानप्राप्तीशिवाय योग्य दिशा मिळणार नाही शिवाय कर्तृत्वाच्या वेगवेगळया क्षेत्रात मुक्त संचार करताय यावा यासाठी शाहू महाराजांनी स्त्री शिक्षणातून स्त्रीजीवन सुखी—समृध्द करण्याचा निर्णय घेतला. समाजात स्वत:चे अस्तित्व निर्माण करून साहसी, शूर, प्रामाणिक, सुसंस्कृत, सालस, आदर्श आणि नम्र स्त्री निर्माण करण्याचे महाराजांचे ध्येय होते.यासाठी महाराजांनी स्त्रीविषयक विविध कायदे केले यामध्ये बालविवाह प्रतिबंध, आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन, पुनर्विवाह इ. चा समावेश होतो.

**शाहू महाराजांची अर्थनिती:**

राजर्षी शाहू महाराजांचा शैक्षणिक कार्याबरोबर आर्थिक कार्यामध्ये मोलाचा वाटा आहे. त्यांनी कृषी क्षेत्रातील खराब स्थिती आणि त्यामुळे वाढणारी शेतक—यांची गरीबी पाहून कृषीची उत्पादकता व शेतक—यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न सुरू केले. कोल्हापूर संस्थान असे पहिले संस्थान आहे की जिथे कृषी उत्पादन वाढण्यासाठी आणि विविध योजना अंमलात आणण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा स्विकार केला गेला. १९१२ ला महाराजांनी किंग एडवर्ड कृषी संस्थान ची स्थापना केली होती. या संस्थानच्या माध्यमातून संकरित बियाणे, खाद्य, पशुपालन इ. ची माहिती शेतक—यांपर्यंत पाहोचू लागली. याचबरोबर महाराजांनी १ जून १८९९ ला एक अद्यादेश जारी करून सावकारींवर विविध निब्रंध लादले. यामुळे शेतक—यांच्या पिकांवरील जप्तींवर निर्बंध आणले. महाराजांनी आर्थिक कार्य बळकटी येण्यात महत्वाचे म्हणजे पन्हाळामध्ये चहा, कॉफी आणि रबर यांची शेती तसेच शेतक—यांना बटाटा, कापूस, रेशीम इ. पीके घेण्यास प्रोत्साहन दिले. त्यांच्या काळात पन्हाळा चहा नं. ४ या नावाने एक ब्रॅड जारी केला पण त्यांच्या मृत्यूनंतर या ब्रॅडचा पण अंत झाला. शाहूं राजांची बांधलेले राधानगरी धरण संपूर्ण कोल्हापूर संस्थानच्या आर्थिक घडामोडीत कायापालट करणारे ठरले. कृषी क्षेत्राला एक मोठी संजीवणी देणा—या राधानगरी धरणाने संपर्ण कोल्हापूर जिल्हा सामाजिक आर्थिक प्रगतीत देशभर नावारूपाला आणला. यामागे शाहू महाराजांची दूरदृष्टी मोलाची ठरल्याचे दिसून येते. महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक जडणघडणीत शाहू महाराजांनी केलेले कार्य अविस्मरणीय असेच आहे. शेती व औद्योगिक प्रदर्शने भरवून विविध प्रकारची नवनवीन शेती उत्पादने घेण्यास प्रोत्साहित केले. त्यांनी पन्हाळयावर चहा, कॉफी, रबर यांच्या लागवडीचे विविध प्रयोग केले. कृषी उत्पादनासाठी शाहूपूरी, जयसिंगपूर यांसारख्या बाजारपेठांची निर्मीती केली त्यामुळे कोल्हापूर ही गुळाची बाजारपेठ म्हणून देशभर प्रसिध्द झाली. कोल्हापूरमध्ये कारखानदारीचा पाया महाराजांनी घातला. वस्त्रोद्योगास चालना देण्यासाठी त्यांनी शाहू मिलची स्थापना केली. यामुळे वस्त्रोद्योगास नवीन उर्जा प्राप्त होण्यास मदत झाली. कोल्हापूर संस्थानमध्ये शाहू महाराजांनी केलेले विविध क्षेत्राच्या विकासातील काम व त्यांचे योगदान इ. मुळेच कोल्हापूर संस्थानचे नांव विविध क्षेत्रात संपूर्ण देशभर पसरले आहे.

**अस्पृश्य—दलितांचे कैवारी:**

तत्कालिन महाराष्ट्रात विविध जाती—धर्माचे लोक आपापले परंपरागत उद्योग—व्यवसाय करत होते. समाज मानसिकदृष्टया मागासलेल्या अवस्थेत असल्याने दलित—अस्पृश्य समाजावर अन्याय, अत्याचार होत होते. शाहू महाराजांनी दलितांवरील अन्याय, अत्याचार दूर करण्यासाठी धाडसी पावले उचलली. अस्पृश्य वर्गाच्या उन्नतीसाठी निरपेक्ष, त्यागाच्या भावनेतून जाणिवपूर्वक प्रयत्न केले. दिन—दलितांवरील अन्याय पाहून शाहू महाराज पेटून उठत यामुळेच ते समाजातील तळागाळातील दिन—दलितांचे कैवारी म्हणून ओळखले जातात. समाजातील अज्ञान, अंधश्रध्दा इ. ने ग्रासलेल्या समाजाला सज्ञान करण्यासाठी शिक्षण हे प्रभावी हत्यार अवलंबले. गोरगरिबांच्या झोपडपट्टीपासून ते पारधी समाजाच्या वसाहतीपर्यंत शिक्षण पोहचवण्याचे महत्वाचे कार्य शाहू महाराजांनी केले. सन १८९६—९७ मध्ये अस्पृश्यांसाठी असलेल्या शाळांची संख्या ६ इतकी होती परंतू शाहू महाराजांनी अस्पृश्यांसाठी शिक्षण कार्य करण्यास सुरवात केल्यानंतर अशा शाळांची संख्या २५ वर गेली आणि या शाळांमध्ये शिकणा—या विद्यार्थ्यांचे प्रमाणही वाढून ८५० इतकी झाली. अस्पृश्यांसाठी शिक्षण सहज उपलब्ध व्हावे यासाठी महाराजांनी कोल्हापूर बरोबरच पंढरपूर, नागपूर, नाशिक इ. ठिकाणी स्वतंत्र वसतिगृहे काढली. १९११ मध्ये अस्पृश्यांसाठी फी माफी करण्यात आली शिवाय त्यांच्यासाठी स्वतंत्र शिष्यवृत्तीचीही व्यवस्था केली. ब्राम्हणांचे वर्चस्व झुगारून अस्पृश्यांना शिक्षणातून सक्षम करणे हेच शाहू महाराजांचे ध्येय होते.

**कलाप्रेमी राजा:**

शाहू महाराज कलाप्रेमी होते. कोल्हापूर संस्थानमध्ये विविध कलाकार प्रसिध्द होते या कलाकारांना शाहू महाराजांनी मोठा आश्रय दिला. विशेषत: कुस्ती या खेळप्रकारास अधिक प्रोत्साहन दिले यामुळे मल्लविद्योची पंढरी

म्हणून कोल्हापूर सर्वदूर परिचित झाले. स्वसंरक्षण आणि शरीर संवर्धन यासाठी मल्लविद्येची गरज असल्याचे महाराजांचे ठाम मत होते. सामान्य जनतेमध्ये सदृढ शरीर याविषयी आवड निर्माण व्हावी यासाठी महाराजांनी कुस्ती कलेस विशेष प्राधान्य दिले. १९०२ साली इंग्लंडला दिलेल्या भेटीदरम्यान महाराजांनी रोम शहरात भव्य गोलाकार आखाडा पाहिला व कोल्हापूरात परत आल्यानंतर तसाच आखाडा खासबाग येथे तयार केला. आज या आखाडयात तयार झालेले मल्ल देश–विदेशात आपले कौशल्य दाखवत आहेत. कोल्हापूरच्या मातीत तयार झालेल्या कलाकारांना शाहू महाराजांनी मोठा राजाश्रय दिला. रंगभूमी गाजवणारे आण्णासाहेब किलोस्कर, चित्रकलेतील आबालाल रहिमान, तबलावादक दादा लहू, नाटककात गोविंदराव टेंबे, सिनेसृष्टी गाजवणारे बाबूराव पेंटर इ. अनेक कलाकारांना महाराजांनी उत्तेजन दिले. व्ही. शांताराम, भालजी पेंरकर, मा. विनायक अशी दिग्गज मंडळी या कालावधीतच कोल्हापूर नगरीत तयार झाली. महाराजांनी केवळ आहे त्याच कलाकारांना उत्तेजन दिले नाही तर नवनवीन कलाकारांना स्वत:चे अस्तित्व सिध्द करण्यासही उद्युक्त केले. या थोर राजांच्या आशिर्वादामुळे कोल्हापूर नगरी कलानगरी म्हणून उदयास आली. शाहूंनी तमासगीर, शाहीर, नाटककार, चित्रकार, संगीतकार आणि मल्ल या सर्वाच्या कलेला उत्तेजन देण्याचे कार्य महाराजांनी केले.

**सारांश:**

राजर्षी शाहू हे एक अष्टपैलू व्यक्तिमत्व आपल्या कार्य–कर्तृत्वाने राज्याबरोबरच संपूर्ण देश व जगभर रयतेचा राजा म्हणून अविस्मरणीय असे झाले आहे. राजर्षी शाहू महाराजांनी तत्कालिन परिस्थितीला अनुसरून घेतलेले निर्णय आजही सामाजिक व आर्थिक बदलांना हितकारक ठरत असल्याचे चित्र आहे. व्यापक समाजहित लक्षात घेऊन शाहूंनी जाती–जातींमधील तेढ हटवण्याचे काम केले तेच काम राष्ट्रहिताचे म्हणून आज शासन स्तरावर केले जात आहे. असे असले तरी शाहू महाराजांना अपेक्षित असलेला जातनिर्मूलित महाराष्ट्र आजही राजकारणांच्या उदासिन वृत्तीमुळे पिछाडीवर असलेला दिसतो. शाहू महारारांची शेती विकासाबाबतची दूरदृष्टी राधानगरी धरणाच्या रूपाने आज कोल्हापूर जिल्यास वरदान ठरली आहे. आजही राधानगरी धरणामुळे संपूर्ण जिल्हयाचे आर्थिक नियोजन उच्च असल्याचे दिसून येते. यातूनच राजर्षी शाहूंचे आजच्या युगातील महत्व अधोरेखित होते. राजर्षी शाहूंचे विचार, कार्य करण्याची लकब, सर्वसामान्यांप्रती असलेली आपुलकी, कलेची उत्तम जाण, शिक्षणाप्रती असलेले प्रेम, जनतेचे हीत इ. मुळेच संपुर्ण जगभर हा राजा अष्टपैलू व्यक्तिमत्व असलेला राजा म्हणून ओळखला जात आहे.

**संदर्भ:**

१. पवार जयसिंगराव (२००१), राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ, कोल्हापूर.
२. पवार जयसिंगराव (२००५), राजर्षी शाहू छत्रपती: एक मागोवा, मेहता पब्लीकेशन हाऊस, कोल्हापूर.
३. भगत रा. तु. (२००३), राजर्षी शाहू छत्रपती: जीवन व शिक्षण कार्य, सिध्दराज प्रकाशन, पुणे.
४. पवार जयसिंगराव (२००८), श्रीमच्छत्रपती शाहू महाराज यांचे चरित्र, शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय, कोल्हापूर.
५. विजयराव शिंदे व पवार जयसिंगराव (२०११), राजर्षी शाहू दर्शन, भारती मुद्रणालय, कोल्हापूर.
6- Keer Dhananjay (2017), Shahu Chhatrapati, Popular Prakshan Pvt. Ltd., Mumbai.